'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 291C : Recent Trends in Humanities, Commerce & Management and Science & Technology. Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April : 2022

# जागतिकीकरण आणि उत्तम कांबळे यांच्या कवितेतील महानगरीय जाणीव

**प्रा. सौ. ललिता सिद्धार्थ हिंगोणेकर**
ज.जि. म. वि. प्र.सह. समाजाचे
श्री. सा.म. पाटील कला, श्री. भाऊसाहेब टी.टी. साळुंखे वाणिज्य आणि श्री. जी. आर. पंडित विज्ञान महाविद्यालय, जळगाव

भारतात खाजगीकरण, उदारीकरण आणि त्या जागतिकीकरणाचे नवीन औद्योगिक धोरण २४ जुलै १९९१ रोजी स्वीकारण्यात आले. भारत हा कृषीप्रधान देश असल्याने याचे विध्वंसक परिणाम दिसत आहेत. जागतिकीकरण या संकल्पनेचा विचार प्रामुख्याने आर्थिक संदर्भात केला जात असला तरी या संकल्पनेचा संबंध मानवी जीवनाच्या अनेक अंगांची आहे. मानवी जीवनावर चांगले वाईट परिणाम करणारी ही संकल्पना आहे. समाज, साहित्य, संस्कृती, कला, विज्ञान, धर्म ,शिक्षण, आरोग्य, रोजगार या मानवी जीवनावर जागतिकीकरण या संकल्पनेचा प्रभाव पडताना दिसत आहे.

जागतिकीकरणामुळे संपूर्ण उपेक्षित समाजाचे जीवन-मरणाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. 'जागतिकीकरण म्हणजे विकसित राष्ट्रांनी जाणीवपूर्वक स्वत करिता बाजारपेठ खुली व्हावी यादृष्टीने स्वीकारण्यास लावलेले जागतिक धोरण होय'. इंग्लंड, अमेरिका, युरोप यासारख्या भांडवलशाहीचा पुरस्कार करणाऱ्या साम्राज्यवादी देशांनी आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी हा एक प्रकारे कट रचलेला आहे. जागतिकीकरणाची व्यवस्था सामान्य माणसाच्या जीवनाला उद्ध्वस्त करीत आहे. जागतिकीकरणाचा प्रचंड परिणाम समाजातील उपेक्षित घटकांवर होत आहे. शेतमजूर, शेतकरी, कामगार ,अकुशल कामगार, बाल कामगार, दलित, आदिवासी इत्यादी घटकांवर याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम होत आहेत.

उत्तम कांबळे जागतिकीकरण या संकल्पनेबद्दल म्हणतात, जागतिकीकरणामुळे गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी अधिक रुंदावत आहे नव्या नव्याने विषमता जन्माला येत आहेत, 'जो सक्षम असेल तोच जगेल' असे सांगणारी ही व्यवस्था गरिबांचे अधिक शोषण करणारी आणि त्याला अधिक अस्थिर बनविणारी आहे.

जागतिकीकरणामुळे आर्थिक क्षेत्राबरोबर सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादी क्षेत्रावरही परिणाम होत आहे .तसेच साहित्यावर, भाषेवरसुद्धा त्याचा परिणाम दिसू लागलेला आहे.आज जागतिकीकरण अटळ झाले आहे आणि त्यापासून कोणालाही वेगळे राहणे शक्य नाही. प्रस्तुत शोधनिबंधात जागतिकीकरणातील मराठी कवितेत उत्तम कांबळे यांच्या कवितेत महानगरीय जाणिवा कशा व्यक्त झाल्या आहेत ,त्याचे स्वरूप काय आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

**महानगरीय जाणीव** – शहरी व महानगरीय जीवनाशी, समस्यांशी निगडीत जाणिवेला महानगरीय जाणीव असे म्हटले जाते. महानगरीय जीवनामध्ये वास्तव करणारा कवी महानगरीय जाणीवेशी मोठ्या ताकदीने समरस होऊ शकतो. कारण तो ते जीवन जगत असतो आणि डोळसपणे बघत असतो. त्यामुळे महानगरीय शब्दरचना मोठ्या प्रमाणात आले म्हणजे ती महानगरीय कविता होत नाही, तर त्या कवितेत महानगरीय जीवनाचं जाणिवेसह प्रतिबिंब उमटणे गरजेचे आहे. वसंत पाटणकर म्हणतात, महानगरातील विशिष्ट परिस्थितीमुळे येथे दीर्घ काळ वास्तव्य करणाऱ्या माणसाची मानसिक घडण बदलते. या विशिष्ट मानसिक घटणीलाच आपण महानगरीय संवेदनशीलता म्हणतो. वसंत पाटणकर यांचे हे म्हणणे महानगरीय जाणीवेबद्दल भाष्य करते. मराठी कवितेत निखळ महानगरीय जाणिवेने लेखन करणारे कवी कमी आहेत. त्यासंदर्भात नितीन रिंढे म्हणतात, महानगरी परिघाबाहेरचे अरुण काळे, भुजंग मेश्राम, प्रवीण बांदेकर, वीरधवल परब, अजय कांडर किंवा महानगरातले वर्जेश सोळंकी, नितीन कुलकर्णी, महेंद्र भवरे हे कवी जागतिकीकरणाला सामोरे जाताना अत्यंत चिकित्सक दृष्टिकोन बाळगून आहेत. हे त्यांच्या कवितेतून जाणवते. त्यांच्या कवितेतून त्यांचे दृष्टिकोन, भूमिका उभ्या राहतात. नितीन रिंढे यांचे म्हणणे जागतिकीकरणासोबत महानगरीय जाणवेबद्दल भाष्य करताना दिसते. म्हणजेच महानगराबाहेरचे व महानगरीय कवी जागतिकीकरणाशी तेवढ्याच ताकदीने भिडताना दिसतात. फरक फक्त त्यांच्या भूमिका आणि दृष्टीकोन यामध्ये दिसून येतो.

**उत्तम कांबळे यांच्या कवितेतील महानगरीय जाणीव** – १९९० नंतर लिहिल्या जात असलेल्या समकालीन कवितेला अन्य संदर्भासह जागतिकीकरणाचा विशेष संदर्भ आहे. नव्वदोत्तर कवितेत समकाळात घडून गेलेल्या ताज्या महानगरीय घडामोडींचाही संदर्भ आहे. या महानगरीय घडामोडींमध्ये मानवी भाव-भावना, संवेदना सहवेदना, वैचारिक दृष्टी, जीवनविषयक दृष्टी, आपले शेजारी, कुटुंबातील आजी-आजोबा, आई-वडील, काका-काकी, बहिण- भाऊ, तसेच मित्रत्व या सगळ्यांकडे पाहण्याच्या दृष्टीत फार मोठा बदल झालेला दिसतो. नव्वदोत्तर कालखंडातील ही महानगरी संवेदनशीलता प्रामुख्याने श्रीधर तिळवे, हेमंत दिवटे, मंगेश नारायण काळे, संजीव खांडेकर ,वर्जेश सोलंकी, महेंद्र भवरे, मन्या जोशी, सलिल वाघ, सचिन केतकर, अविनाश गायकवाड यांच्या कवितेत निखळ स्वरूपात प्रकट होते. तसेच भुजंग मेश्राम, अरुण काळे, संतोष पवार, दिनकर मनवर, वीरधवल परब, अजय कांडर, उत्तम कांबळे, प्रज्ञा लोखंडे, मल्लिका अमर शेख, दासू वैद्य, प्रवीण बांदेकर, अजीम नवाज राही, लोकनाथ यशवंत, धम्मपाल रत्नाकर, रोहन नागदिवे यांच्या कवितेत जाणीव किंवा सहजाणिवेने ही महानगरीय संवेदना व्यक्त होताना आढळते.

नव्वदोत्तर कालखंडातील उत्तम कांबळे हे एक कवी आहेत. त्यांच्या गद्य लेखनातही कवित्वाची जाणीव होते. त्यांचे 'जागतिकीकरणात माझी कविता 'आणि 'नाशिक तू एक सुंदर कविता' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. माहिती आणि तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे संपूर्ण जग जवळ आले आहे. जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात संपर्क साधणे सहज शक्य झाले आहे. याचा परिणाम महानगरात जीवन जगणाऱ्या माणसांवर होऊ लागला. माणूस माणसावर विश्वास न ठेवता यंत्रमानवावर विश्वास ठेवू लागला हे सत्य उत्तम कांबळे 'जागतिकीकरणात माझी कविता' या कवितेमध्ये मांडताना म्हणतात -

सारं जग जवळ आलंय म्हणतात


Website : www.researchjourney.net Email : researchjourney2014@gmail.com
Peer Reviewed Referred & Indexed Journals